# संपादकीय

## कृषिमंत्री निधीसाठी हतबल

विधिमंडळाच्या २०२३ साली पार पडलेल्या अधिवेशनात कृषी विभागाकडून देण्यात आलेल्या आश्वासनाची अद्याप पूर्तताच झालेली नाही. कृषी विभागाला निधी मिळाला नसल्यामुळे कामे करण्यास अडचणी येत असल्याची कबुली राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी विधान परिषदेत दिली आहे. कृषी विभागाचे वार्षिक १२०० कोटी रुपयांचे बजेट आहे. मात्र, यंदाच्या बजेटमध्ये निधीची कोणतीच तरतूद नाही. बजेट नसल्यामुळे नवीन कोणत्याही कामाला परवानगी देऊन सरकारला अडचणीत आणणार नाही. २०२३ साली आश्वासन दिलेली कामे सध्या अर्धवट असल्याने आधी ती पूर्ण करण्यावर भर देणार असल्याची माहिती माणिकराव कोकाटे यांनी सभागृहात दिली आहे. २०२३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात संशोधन केंद्र स्थापनेबाबत आश्वासन देण्यात आले होते. मात्र, संशोधन केंद्र स्थापन करण्याच्या प्रस्तावास नियोजन व वित्त विभागाने अनुकूलता न दर्शविल्याने त्यावर कार्यवाही करता आलेली नाही. सद्यस्थितीत राज्यातील कृषी विद्यापीठांतर्गत नवीन महाविद्यालयाची तसेच संशोधन केंद्राचे शासनावर लक्षणीय प्रमाणात दायित्व असल्याने हे दायित्व कमी होईपर्यंत नवीन महाविद्यालय आणि संशोधन केंद्र स्थापन न करण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे, असे त्यांनी म्हटले. माणिकराव कोकाटे पुढे म्हणाले की, सद्यस्थितीत राज्यात ७६ संशोधन केंद्र आणि १०९ अखिल भारतीय समन्वय संशोधन प्रकल्प आहेत. वसंतराव नाईक मराठा वाडा कृषी विद्यापीठाअंतर्गत एकूण १८ संशोधन केंद्र कार्यरत आहेत. तसेच २२ अखिल भारतीय समन्वय संशोधन प्रकल्प आहेत. मी सुद्धा या बाबतीत खूप सकारात्मक आहे. माझी देखील इच्छा आहे की, महाविद्यालय आणि इतर सगळ्या गोष्टीत पैसे खर्च करण्यापेक्षा आपण संशोधन केंद्रावर अधिक भर दिला तर शेतकऱ्यांना त्यातून जास्त संशोधन आणि फायदा होण्याची शक्यता आहे. नवीन कामाला मंजुरी देण्यात आलेली नाही. या गोष्टी गृहीत धरून सतीश चव्हाण आणि विक्रम काळे यांना दोघांना बरोबर घेऊन राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांच्या समवेत एक बैठक आयोजित करण्यात येईल आणि कॅबिनेटला पुन्हा हा प्रस्ताव सादर करण्यात येईल. वित्त विभागाचे आक्षेप आहेत, त्यामुळे सरकारला अनियमितता करता येणार नाही. सरकार वित्त विभागाला सोबत घेऊन सकारात्मक निर्णय घेईल. संशोधन केंद्राला २०२३ नंतर काही निधी दिला आहे का नाही ? हे मला बघावा लागेल. पण, महाविद्यालयाला निधी देण्यात आलेला आहे. संशोधन केंद्रासाठी एक धोरण तयार करावे लागेल आणि ते धोरण वित्त विभागाकडून मान्य करून घ्यावे लागेल. कोणत्याही दुसऱ्या नवीन कामाला मंजुरी देण्यात आलेली नाही.

## भाजपा कर्जत ग्रामीण मंडळ यांची कार्यकारणी जाहीर

**कर्जत ग्रामीण (अग्रलेख वृत्तसेवा) -** भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार प्रशांत दादा ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी आणि आमदार सुरेश लाड यांच्या नेतृत्वात कर्जत ग्रामीण मंडळ अध्यक्ष दिनेश माधव रसाळ यांनी भाजपा कार्यकारणी जाहीर करण्यात आली. या कार्यकारणीमध्ये मंडळाची फादर बॉडी आहे. त्यामध्ये १६ पदाधिकारी, ५ महिलांचा सहभाग त्यानंतर ६१ जणांची मुख्य कार्यकर्ते मंडळाची कार्यकारणी. यामध्ये १५ महिलांचा सहभाग तसेच एसटी एससी यांचा कोठा पूर्ण केलेला आहे. याच्यानंतर मोर्चे, आघाडी, प्रकोष्ट, पंचायत समिती गण कार्यकारणी, जिल्हा परिषदची कार्यकारणी आणि ग्रामपंचायतची कार्यकारणी एकंदरीत याचा विचार केला तर आगामी काळामध्ये ५०० ते ५५० पर्यंत नियुक्तीचे आकडे होतील.

**त्यामधील नियुक्त्या पुढीलप्रमाणे -** सरचिटणीस रामदास किसन घरात व सचिन सूर्याजी म्हसकर, उपाध्यक्ष कृष्णा रामचंद्र शिंगोले, निलेश एकनाथ पिंपरकर, अंकिता वैभव भोईर, प्रतिभा विनायक बार्णे, चिटणीस रवींद्र बाळू म्हसे, काशिनाथ हिरु रसाळ, मंजुलाबाई भिका गावंडा, सारिका शंकर पादिर, कोषागर अध्यक्ष रवींद्र हरिश्चंद्र वेहेले, महिला मोर्चा अध्यक्ष संगीता अनिल हरपुडे, युवा मोर्चा अध्यक्ष काशिनाथ बळीराम भोईर, ओबीसी मोर्चा अध्यक्ष भगवान रामचंद्र डोंगरे, अनुसूचित जाती मोर्चा अध्यक्ष दिलीप दत्तू सावळा, अल्पसंख्यांक अध्यक्ष फुरकान ख्वाजा कुरेशी, किसान मोर्चा अध्यक्ष प्रमोद दुंदा बार्शी, जि.प.वार्ड अध्यक्ष पाथरज विनायक सुदाम पवार, पं.स. कशेळे प्रमोद तुकाराम मसने, जि. प.कळंब संदीप बाळू पालांडे, पं स. कशेळे शरद चंदू इष्टे, पं. स.कलंब दौलत लक्ष्मण भुसावल, पं.स.पोशिर योगेश अण्णा दुर्गे तसेच कामगार आघाडी, उद्योग आघाडी, व्यापार आघाडी,भटके विमुक्त आघाडी, उत्तर भारतीय मोर्चा, वैद्यकीय सेल, कामगार सेल,सहकार सेल, मच्छीमार सेल, वाहतूक सेल, सोशल मीडिया सेल, आयटी सेल,दिव्यांग सेल, शिक्षक सेल, बुद्धिजीवी सेल,पंचायत ग्राम राजविकास सेल,सांस्कृतिक सेल,जेष्ठ कार्यकर्ते सेल, अध्यात्मिक प्रकोष्ट,पदवीधर प्रकोष्ट, क्रीडा प्रकोष्ट, बेटी बढाओ बेटी पढाव सेल,आयुष्मान सेल,नियुक्ती करण्यात आल्या.तसेच मंडळ अंतर्गत प्रमुख जबाबदाऱ्या व अत्यावश्यक सेवा यासाठी नियुक्त्या करण्यात आल्या २२ शक्तिकेंद्र प्रमुखांच्या नियुक्त्या करण्यात आल्या लवकरच मतदार याद्यांप्रमाणे पन्ना प्रमुखांच्या नियुक्त्या जाहीर केल्या जातील तसेच लवकरच गाव, वाड्या आणि वस्ती तेथे भाजपा शाखांची नेमणूक करण्यात येणार आहे असे आव्हान दिनेश रसाळ यांच्याकडून करण्यात आले.कर्जत तालुका भाजप नेतृत्व दीपक बेहेरे,वसंतराव भोईर, किरण ठाकरे, सुनील गोगटे, रमेशजी मुंढे, मंगेश मस्कर, नितीन कांदलगावकर,राजेशजी भगत यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनी या कर्जत ग्रामीण मंडल कार्यकारणीचे स्वागत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## मुंबई-पुणे मार्गावर टोल ठेकेदाराला झुकते माप; 'कॅग'च्या अहवालात ताशेरे

**(पान १ वरुन)** वसुली होऊ न शकल्यास सरकारकडून नुकसानभरपाई मिळणार नाही, अशी करारात तरतूद होती. २३ मार्चपासून करोना साथरोगामुळे टाळेबंदी लागू करण्यात आली. टोलवसुली थांबल्याने २५ दिवसांची नुकसानभरपाई मिळावी, अशी मागणी आयआरबी कंपनीच्या वतीने महाराष्ट्र रस्ते विकास मंडळाकडे करण्यात आली. गैरराजकीय घटना असल्याने नुकसानभरपाई देण्यास ९ एप्रिल २०२० रोजी रस्ते विकास मंडळाने नकार दिला होता. पण २० एप्रिल रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या बैठकीत २५ दिवसांच्या नुकसानीच्या आधारावर ७१ कोटी रुपयांची सवलत देण्याचा निर्णय घेण्यात आला. आयआरबी कंपनीच्या विनंतीनुसार ७१ कोटींची सवलत देण्यात आली असल्याचे कागदपत्रांवरून स्पष्ट होते.

वास्तविक गैरराजकीय घटनांशी संबंधित प्रकरणांना विम्याचे संरक्षण लागू करण्याची करारात तरतूद होती. प्रत्यक्षात ठेकेदाराने विमाच कानसल्याचे चौकशीत निदर्शनास आले. गैरराजकीय नुकसानीसाठी विमा संरक्षण आवश्यक असताना आयआरबी कंपनीने विमाच कानव्हता. तरीही रस्ते विकास मंडळाने नुकसानभरपाईपोटी ७१ कोटी रुपयांची सवलत दिली होती.

लवादाने ७१ कोटींची रक्कम सरकारला परत करण्याची सूचना ठेकेदाराला केली होती. यानुसार ही रक्कम पुन्हा वसूल करण्याचा आदेश आयआरबी कंपनीला देण्यात आल्याचे शासनाच्या वतीने 'कॅग' समोर स्पष्ट करण्यात आले. 'कॅग'च्या अहवालानुसार ठेकेदाराला ७१ कोटींचा फायदा होईल, असा निर्णय घेण्यात आला होता. पण महालेखापरीक्षकांनी ताशेरे ओयानेच ठेकेदाराला ही रक्कम परत करावी लागणार आहे. ठेकेदाराने करारातील विमा संरक्षणाच्या तरतुदीचे उल्लंघन केल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यावर रस्ते विकास मंडळाची भूमिका समजू शकली नाही.

## शिखर बँक आर्थिक गैरव्यवहाराचे प्रकरण; रोहित पवार यांच्याविरुद्ध आरोपपत्र दाखल

**(पान १ वरुन)** अहवालाच्या आधारे अत्यंत कमी किंमत निश्चित करून कन्नड सहकारी साखर कारखान्याचा लिलाव केला. त्यात बारामती ॲग्रो लिमिटेड व्यतिरिक्त, इतर दोन पक्ष बोली प्रक्रियेत सहभागी झाले. सर्वाधिक बोली लावणाऱ्याला तांत्रिकदृष्ट्या कमकुवत कारणांमुळे अपात्र ठरवण्यात आले, तर दुसरी बोली लावणारा व्यावसायिक बारामती ॲग्रो लिमिटेडशी संबंधित होता आणि त्याची साखर कारखाना चालवण्याची कोणतीही आर्थिक क्षमता अथवा त्याचा कोणताही अनुभव नसल्याचा ईडीचा आरोप आहे. विशेष न्यायालयाने पवार यांच्याविरुद्ध ईडीने दाखल केलेल्या आरोपपत्राची दखल घेताना, फसवणुकीद्वारे लिलाव प्रक्रिया राबवण्यात आल्याचे आणि या प्रक्रियेत पवार यांचा सक्रिय सहभाग असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते, असे म्हटले. बारामती ॲग्रो लिमिटेड आणि हाय-टेक इंजिनीअरिंग कॉर्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेड यांच्यात कारखाना कमी किंमतीत विकत घेण्यासाठी पूर्वनियोजित कट आखण्यात आल्याचेही सकृतदर्शनी दिसून येते. थोडक्यात, पवार आणि इंगवले दोघेही बारामती ॲग्रोसह फसवणुकीद्वारे करण्यात आलेल्या लिलावात सहभागी असल्याचा निष्कर्ष काढण्यासाठी पुरेसे पुरावे आहेत, असेही न्यायालयाने आरोपपत्राची दखल नमूद केले.

## आळंदी पोलीस निरीक्षकाला दगडाने मारण्याचा प्रयत्न; व्हिडिओ व्हायरल

**(पान १ वरुन)** हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचे पाहायला मिळत आहे. आळंदीमधील पीएमटी चौकात पुलावर रिक्षा चालक थांबला होता. वाहतूक पोलीस निरीक्षक सतीश नांदुरकर यांनी त्याला हटकले. त्याला पुलावरून पुढे जाण्यास सांगितले. कारण तिथून बस वळण्यासाठी अडचण होत होती. परंतु, त्या ठिकाणाहून तो जात नव्हता. अखेर पोलीस निरीक्षक सतीश नांदूरकर यांनी त्याला चापट मारली आणि याचा राग मनात धरून त्याने सतीश नांदुरकर यांच्यावर रस्त्यावर पडलेला दगड घेऊन मारण्याचा प्रयत्न केला. ही सर्व घटना काही सजग नागरिकांनी आपल्या मोबाईलमध्ये कैद केली आहे. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल होत असून स्वत: सतीश नांदुरकर यांनी रिक्षा चालकाला समजावून पुढे जाण्यास सांगत आहेत. सतीश नांदुरकर यांनी त्याची माफी देखील मागितली, असे या व्हिडिओमध्ये स्पष्ट दिसत आहे.

## वात्रटिका

### 'डुबे डुबे के मारेंगे'



'पटक पटक के मारेंगे'च्या धमकीला
'डुबे डुबे के मारेंगे'चे मिळाले प्रतिउत्तर
मराठी माणसाला धमकी देणाऱ्याचे
खरंच असतील का बाप सत्तर ?

राज ठाकरेंना दिला इशारा
पुन्हा दुब्या गरळ ओकली
'मैने राज ठाकरे को हिंदी सिखादी' म्हणत
पुन्हा स्वत:च्या एकलेची लक्तरे काढली

मोदींना भाजपची गरज नाही
भाजपला मोदींची गरज आहे
दुबेच्या या वक्तव्याने
स्वत:च्या पक्षाचीच त्याने इज्जत काढली

स्वत:च्या पक्षाशी इमान न राखणाऱ्याने
मराठी माणसाला डिवचू नये
महाराष्ट्रात शांतता भंग करण्याचा डाव
'उपऱ्या'ने तरी शिजवू नये

**- उमेश सुरेखा मारुती भेरे**
(संपादक, अग्रलेख)

Owner, Printer, Publisher and Editor UMESH MARUTI BHERE, AT POST DHASAI, TAL-SHAHAPUR, DIST-THANE, MAHARASHTRA. 421601, Printed at UDDESH VIKAS OFFSET PRINTING PRESS, LOKMANYA TILAK NAGAR, SECTION-20, KHETI AREA, ULHASNAGAR-421003. DIST-THANE, MAHARASHTRA. Published form UMESH MARUTI BHERE, AT POST DHASAI, TAL- SHAHAPUR, DIST-THANE, MAHARASHTRA. 421601, MOB. 8007101060, Editor : UMESH MARUTI BHERE, Editor do not necessarily agree with articles or news published in this newspaper, RNI NO - MAHMAR/2021/81361
Head Office Add.- Agralekh office, Sai Plaza, A wing, apartment no. A-3, 2nd floor, Gramin House No. 665, Gotheghar, Shahapur. 421601.